NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

(सायंकाळ)

दिनांक २५.१०.२०२६ रविवार

(गुन्हे)

१) पोलीस ठाणे पाचपावली :–शस्त्र बाळणाऱ्या आरोपीस अटक.

दिनांक २५.१०.२०२६ चे ०२.४५ वा. चे सुमारास, पाचपावली पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असतांना, शनिचरा बाजाराचे ओटयाजवळ एका ॲक्टिवा गाडीवरील इसम संशयीतरित्या दिसल्याने, त्याचेजवळ जात असता, तो पोलीसांना पाहुन पळू लागला. त्याचा पाठलाग करुन त्यास ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव मोहम्मद ताबिश हयात रहीम खान वय १९ वर्षे, रा. अन्सारनगर, मोमीनपुरा, ह.मु. इस्माईलपुरा, नवीन कामठी, नागपुर असे सांगीतले. त्याची अंगझडती घेतली असता, त्याचे ताब्यात एक लोखंडी मोठा चाकु किंमती १,०००/–रू. चा मिळुन आला.

आरोपी हा कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने चाकु बाळगतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, सरतर्फे फिर्यादी पोअं. विनोद समदुरे यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे पाचपावली येथे पोउपनि नरेश पंडीत यांनी आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. आरोपीचे ताब्यातुन चाकु व ॲक्टिवा गाडी क्र. एमएच ४० बीव्ही ३०७६ असा एकुण कि. ६१,०००/– रु. चा मुद्येमाल जप्त करण्यात आला पुढील तपास सुरू आहे.

२) पोलीस ठाणे गिट्टीखदान :– प्राणांतिक अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.

दिनांक ११.१०.२०२६ चे १०.०० वा. चे सुमारास, फिर्यादीचा मुलगा नामे रेहान जावेद दिवाण वय १६ वर्षे, रा. बोरगाव, प्रशांत कॉलनी, गिट्टीखदान, नागपुर हा मित्र नामे हफीज शेख असे त्यांचे दुचाकी क्र. एम.एच. ३१ जीबी ५४१६ ने पोलीस ठाणे गिट्टीखदान हद्दीत, बजरंग चौकाजवळील एटीएम समोरील रोडने जात असता, चारचाकी गाडी क्र. एमएच ३१ ईयु ३३०१ चे चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीचे मुलाचे दुचाकीला मागुन धडक दिल्याने, फिर्यादीचा मुलगा व त्याचा मित्र हे दोघेही गंभीर जखमी झाले होते. त्यांना गंभीर जखमी अवस्थेत उपचाराकरीता मेयो हॉस्पीटल येथे दाखल केले होते. उपचारादरम्यान दिनांक १४.१०.२०२६ चे ०४.२० वा. डॉक्टरांनी फिर्यादीचे मुलास मृत घोषीत केले होते. याप्रकरणी अकस्मात मृत्युची नोंद घेण्यात आली होती. अकस्मात मृत्युचे चौकशीमध्ये आरोपी वाहन चालक फिर्यादीचे मुलाचे मृत्युस कारणीभुत असल्याने निष्पन्न झाल्याने, फिर्यादी जावेद मुस्तफा दिवाण वय ४४ वर्षे रा. बोरगाव, प्रशांत कॉलनी, गिट्टीखदान, नागपुर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे गिट्टीखदान येथे पोउपनि. दीपक इंगळे ९७६५६५६४७० यांनी आरोपी चारचाकी चालकाविरूध्द कलम १०६(१),२८१,१२५(अ),१२५(ब) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

३) पोलीस ठाणे तहसील :— फसवणुक करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.

फिर्यादी उत्तम फुलचंद कश्यप वय ६३ वर्षे, रा. दारोडकर चौक, सीए रोड, नागपूर यांचे पोलीस ठाणे हद्दीत इतवारी सराफा बाजार, शहीद चौकजवळ गुलाबचंद साहेबलाल ज्वेलर्स नावाचे वडीलोपार्जीत दुकान आहे. फिर्यादीचे दुकानातुन लहान मोठे सराफा व्यापारी सोन्याचांदीचें दागिन्यांचे नमुने त्यांचे ग्राहकांना दाखविण्यासाठी घेऊन जातात व ग्राहकांना पसंत पडल्यास, विक्री करुन फिर्यादीचे दुकानात दोन तीन दिवसात पैसे जमा करतात. व्यवहाराची नोंद फिर्यादीचे दुकानातील जांगड रजिस्टरमध्ये घेण्यात येते. दिनांक २७.०६.२०२५ ते ११.०० वा. ते दिनांक ०२.०५.२०२६ चे २१.०० वा. चे दरम्यान, सराफा दुकानदार नामे १) प्रसन्ना प्रफुल सराफ २) प्रफुल प्रेमचंद सराफ वय ६० वर्ष दोन्ही रा. निकालस मंदीरजवळ, लकडगंज, नागपूर यांनी फिर्यादीचे दुकानातुन सोन्याचे दागिने (फाईन) एकुण वजनी १३७.९७२ ग्राम कि. २१,६१,९७६/— रु. चा मुद्येमाल जांगड रजिस्टरमध्ये सहया करुन घेऊन गेले व नमुद दागिने त्यांचे ग्राहकांना विक्री करुन, फिर्यादीस पैसे ने देता, स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता रक्कम वापरुन फिर्यादीचा अन्यायाने विश्वासघात करुन त्यांची आर्थिक फसवणूक केली.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून व अर्जाचे चौकशीवरून पोलीस ठाणे तहसिल येथे पोउपनि. सुरज सिरसाठ ९८९०००० ८२६ यांनी आरोपीविरूध्द कलम ३१६(२),३१८(४),३(५) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

स्वा/—
(अंकुश राठोड)
पोलीस उप निरीक्षक,
पोलीस जनसंपर्क अधिकारी,
नागपुर शहर.